


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com




वर्ष ३ रे | अंक : ७१४ . वा | बुधवार | दि. २० मार्च २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये


# म्हणूनच जिल्ह्यात कमळ फुलणार नाही ?

## सहा विधानसभा मतदार संघ असलेल्या लोकसभा निवडणुकीत सगळ्यात मोठा मतदानाचा वाटा विकासाकडे की भकासा कडे जाणार?

**भाग-10**

**जनसंचलन/बुलढाणा**

भाजपच्या बुलढाणा जिल्ह्यातील प्रस्थापित आजी/माजी आमदारांनी बुलढाणा लोकसभेची जागा शिव-सेना उमेदवाराला विकली / भेट दिली अशी खमंग चर्चा पंतप्रधान मोदी प्रेमी मतदार राजा मध्ये आहे असे समजते. त्यामुळे सहाजिकच नाराजी चा सुर दिसून येत आहे या संतापजनक चर्चेला कारणही तसेच आहे.हे लिहिपर्यंत तरी शिवसेना पक्षाकडून उमेदवारी ची अधिकृत घोषणा झाली नाही. परंतु जळगाव जामोद भाजपचे आमदार संजय कुटे यांनी आज सकाळी ट्विटर हँडलवर प्रतापराव जाधवांची उमेदवारी फायनल असल्याचे सांगितले. म्हणून या चर्चेला उधाण आले असे दिसते. याचा अर्थ असाही होतो की भाजपने मिळत असतांनाच संधी गमावली.जोरकसपणे पाठपुरावा केला च नाही. कथित प्रस्थापितांना जिल्ह्यात भाजपचा खासदार नको. भाजप चा खासदार झाला तर बहचर्चित प्रस्थापितांचे महत्त्व, प्रभाव कमी होईल, ही भिती वाटते. केंद्रीय मंत्री तथा बुलढाणा लोकसभा प्रभारी तथा केंद्रीय मंत्री भुपेंद्र यादव यांनी जिल्ह्यात पाच वेळा दौरा केला. कार्यकर्ते व नेत्यांशी संवाद साधला. पोशक वातावरण निर्माण केले. पण यावर पाणी फिरविले.कथित नेत्यांना आपला राजकीय स्वार्थ महत्त्वाचा वाटला असावा अशीही राजकीय वर्तुळात व सुज्ञ मतदार राज्यात चर्चा आहे. हे खरे असेल तर आगामी विधानसभेत भाजपच्या आमदारांची संख्या कमी होईल आणि शिवसे-नेची संख्या वाढू शकते. प्रस्थापित खासदार भाजपचा व भाजपच्या बुथ नेटवर्क चा पुरेपूर फायदा घेतो.मला मत नको तर मोदींना पंतप्रधान कारायचे अशी भावनिक साद घालतो.काही भाजप त्याला बळी पडते.उमेदवार विजयी झाल्यावर न सांगितले लेच बरे. मतदार राजा जाणकार आहे.त्याला समजले असेलच.भाजप प्रेमी मतदारांचे दुर्दैव कम बहुचर्चित मजबुरी दुसरे काय. नुकतेच काही दिवस अगोदर मेहकर येथे भाजपाची बैठक झाली त्यात भाजपा कार्यकर्ते व पदाधिकारी यांची होणाऱ्या लोकसभा निवडणुकीसाठी प्रतापराव जाधव यांना जिल्ह्यातून नापसंती आली असून भाजपाच्या झालेल्या सर्वेत जाधव यांना चौथ्या क्रमांकावर दाखविल्याची माहिती बैठक मध्ये जाहीर करून सुद्धा जवाबदार लोकप्रतिनिधींकडून सोशलवर ओन्ली वन चे मेसेज व्हायरल करणे कितपत योग्य आहे.अशी खमंग चर्चा उमेदवार फायनल होण्या अगोदरच रंगत असल्याचे चित्र बुलडाणा जिल्ह्यातील ६ विधान सभा मतदार संघात दिसून येत आहे. होणाऱ्या बुलडाणा लोकसभा निवडणूकीत विकास पुरुष यांना भाजपा ने डावलले तर



इतर पक्षांची आलेली ऑफर वेट अन वॉच विचारात घेऊन निवडणूक रिंगणात उतरून ङ्घविकास पुरुषानेङ्घ लढवावी एकतर्फी निवडणूक निकाल हा जिल्ह्यातील सुज्ञ मतदार देतीलच अशी चर्चा मतदारांमध्ये सुरू आहे. **भाजपच्या ज्येष्ठ नेत्यांनी ही बहुचर्चित वास्तविकता कम जमीन स्थरावरील चर्चा लक्षात घेऊन बुलढाणा लोकसभा मतदारसंघात कमळाचाच उमेदवार द्यावा प्रचंड मताधिक्याने विजयी होईल. व कमळ फुलेल**


---

# बुलढाणा जिल्हा परिषदेच्या जिल्हा परिषद मुख्यकार्य अधिकारी विशाल नरवाडे यांची तडकाफडकी बदली...

## त्यांच्या जागी जळगाव जिल्हा परिषदेचे श्री अंकित यांची बुलढाणा जि.प. सिओ पदी नियुक्ती

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलढाणा जिल्ह्यात जिल्हा परिषदेवर नुकतीच नियुक्ती झालेले मूळचे बुलढाणा जिल्ह्याचे रहिवासी आयएएस विशाल नरवाडे यांची महाराष्ट्र शासनाने तडकाफडकी बदली केली आहे.ते बुलढाणा जिल्ह्याचे स्थानिक असल्याकारणामुळे हि बदली करण्यात आली आहे. नुकत्याच लोकसभा निवडणुका जाहीर झाल्या असून आदर्श आचारसंहितेचा भंग होऊ नये म्हणून महाराष्ट्र शासनाकडून जिल्हा परिषद बुलढाणाचे मुख्य कार्यपालन अधिकारी विशाल नरवाडे यांची बदली करण्यात आली आहे. आदर्श आचारसंहितेचा भंग होऊ नये म्हणून गृह जिल्ह्यात पदावर असलेल्या अधिकाऱ्यांना बदलीचे आदेश दिले जातात. बुलढाणा जिल्ह्यातून आझाद हिंद संघटने कडून गृह जिल्ह्यात आलेले आयएएस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यपालन अधिकारी विशाल नरवाडे यांच्या बदलीची मागणी करण्यात आली होती. लोकसभा निवडणुकीदरम्यान गृह जिल्ह्यात त्यांना जिल्हा परिषदेवर मुख्य कार्यपालन अधिकारी म्हणून मोठी जबाबदारी दिल्याने त्यांच्याकडून आदर्श आचारसंहितेचा भंग होण्याची भीती आजाद हिंद संघटने कडून वर्तवली होती.. त्यानंतर आता ही बदली करण्यात आली आहे.काही दिवसांपूर्वीच त्यांनी पदभार स्विकारला होता लोकसभा निवडणुकांमुळे जिल्ह्याचे भूमिपुत्र असलेल्या विशाल नरवाडे यांना बदलीचा फटका बसला आहे. १ फेब्रुवारी रोजी त्यांनी संध्याकाळच्या वेळेस सिईओ पदचा पदभार स्वीकारला होता. भ्रष्टाचार मुक्त आणि शिस्तबध्द प्रशासन देण्याचा त्यांचा



प्रामाणिक प्रयत्न होता.सामान्य जनतेकडून त्यांच्या या उपक्रमाचे मोठ्या प्रमाणात स्वागतही झाले आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मेंढपाळ कुटुंबावरील प्राणघातक हल्ला प्रकरणी ४ जणांना ३ दिवसाची पोलिस कोठडी...

**जनसंचलन/मेरा बु**

शेतात मुक्कामी असलेल्या मेंढपाळ कुटुंबावर गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी १७ मार्च रोजी रात्रीला प्राणघातक हल्ला करून ५ जणांना गंभीर जखमी केले होते त्यामध्ये २ जणांना अटक केले होती. मात्र बाकीचे आरोपी फरार होते. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक करून कोर्टात हजर केले असता न्यायालयाने त्यांना ३ दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे. अंढेरा पोलीस स्टेशनला दिलेल्या तक्रारीत श्रीमती रेखा गजानन शिगडे वय ३५ वर्ष, रा.गणेशपूर ता . खामगाव या मेंढपाळ यांनी नमूद केले होते की, १७ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता मेंढ्यांचा मुक्काम शिंदी येथील संजाबराव हाडे यांच्या मेरा बु. शिवारातील शेतात होता. त्यावेळी शिंदी गावातील काही गुंड प्रवृत्तीचे ८ लोक वाड्यावर येवून त्यांनी काहीही कारणनसतांना आमच्यावर लोखंडी रॉड व काठीने जबर मारहाण करून प्राणघातक हल्ला केला. त्यामध्ये मेंढपाळ कुटूंबातील ५ जण गंभीर जखमी झाले होते. याप्रकरणी रेखा गजानन शिगडे वय ३५ वर्ष रा.गणेशपूर ता. खामगाव, यांच्या तक्रारी वरुन अंढेरा पोलिसांनी आरोपी एकनाथ चिमाजी लष्कर, सोनु उर्फ अनथा एकनाथ लष्कर तथा इतर ६ अनोळखी असलेल्या ६ जणांविरुध्द कलम ३२६,३२४, ३२३,१४३,१४७,१४९,५०४,५०६ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल केला होता. परंतु फरार असलेले सुनील संपत इटकर वय ३४ वर्षे रा. सरंबा फाटा, अविनाश किसन मंजुळकर वय ३३ वर्ष राहणार सिंधी, विशाल मनोहर टाले वय २० वर्ष रा. साखरखेर्डा, सतीश दिनकर यरमुले वय २८ वर्षे राहणार सिंधी या ४ जणांना अटक करून कोर्टात हजर केले असता न्यायालयाने त्यांना ३ दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे

# सैलानी यात्रा भरण्यास सुरुवात; २४ मार्चला लाखो नारळांची होळी,पोलीस प्रशासनाचा राहणार तगडा बंदोबस्त; यात्रेवर राहणार सीसीटीव्हीची नजर

**जनसंचलन/बुलडाणा**

बुलढाणा जिल्ह्यातील सर्वधर्मियांचे श्रद्धास्थान हाजी अब्दुल रहमान उर्फ सैलानी बाबा यात्रेला २५ मार्चपासून होळीपासून सुरुवात होणार असून सैलानी बाबाच्या यात्रेसाठी भाविक भक्त व व्यापारी वर्ग सैलानी यात्रेसाठी दाखल होत आहे. सैलानी यात्रेसाठी भाविकांनी राहण्यासाठी झोपड्या बांधायला सुरुवात केली असून हॉटेल, आकाश पाळणे, खानावळी तसेच सैलानी बाबाच्या झीऱ्यावर अंघोळीसाठी स्नानगृहे बांधणे सुरु झाले आहे. ज्या रस्त्याने सैलानी बाबांचा पिंपळगाव सराई येथून सैलानी दर्गावर जातो त्या रस्त्याची पिंपळगाव सराई ग्रामपंचायतच्या वतीने दुरुस्ती चालू आहे. रायपूर पोलीस स्टेशनच्या वतीने यात्रेवर नियंत्रण ठेवण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे सैलानी दर्गा परिसर इतर मुख्य रस्ते लावण्यात आली आहे. दर्गाच्या बाजूला रायपूर पोलीसस्टेशनच्या वतीने पोलीस चौकी उभारण्यात आली असून चौकीवर २४ तास भाविकांच्या तक्रारींचा निवाडा करण्यासाठी पोलीस कर्मचारी उपस्थित राहणार आहे. सोमवार २५ मार्च रोजी सैलानी बाबाच्या दर्गा परिसरामध्ये होळी पेटवली जाणार असून त्या जागेवर नारळ टाकण्यासाठी जेसीपीद्वारे खड्डा खोदण्याचे काम चालू आहे. होळीच्याबंदोबस्तासाठी रायपूर पोलीस स्टेशनचे ठाणेदार दुर्गेश राजपूत यांच्याकडून नियोजन केले जात आहे. रायपुर प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वतीने सैलानी यात्रेत आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी तसेच पाणी शुद्धीकरणासाठी आरोग्य पथके तयार करण्यात आले आहे. अशाप्रकारे सैलानी बाबाच्या यात्रेसाठी पोलीस प्रशासन व इतर प्रशासन सज्ज झाले आहे.



# बुलढाणा तालुक्यात या पाच गावात तीव्र पाणी टंचाई, टँकरने पाणीपुरवठा केला सुरू....

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलढाणा तालुक्यात काही गावात पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई जाणवत आहे. सध्या या पाच गावात पाणी टंचाई आहे. तलाव कोरडे ठणठणीत झाले आहेत. अन्य तलावात अजूनही पाणीसाठा आहे. टंचाई असलेल्या गावात प्रशासनातर्फे विहिरी, बोअर अधिग्रहणाचे काम सुरु आहे. रुईखेड टेकाळे, पोखरी, वरवंड, ढासळवाडी ,पिंपरखेड गावांनी टँकरची मागणी केली आहे. बुलढाणा तालुक्यातील काही गावातील विहीर अधिग्रहण करून या गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे दररोज रुईखेड टेकाळे येथे एक टँकर टाकण्यात येत आहे. तसेच पोखरी येथे सुद्धा एका टँकरची मागणी होती. वरवंड येथे दररोज चार टँकरची मागणी होती. ढासाळवाडी येथे सुद्धा एका टँकरची मागणी होती तसेच पिंपरखेड येथे सुद्धा एका टँकरची मागणी करण्यात आली होती. त्यामुळे पंचायत समितीने या गावांना २२ फेब्रुवारीपासून या गावात मध्ये टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत आहे. बुलढाणा तालुक्यातील या पाच गावांमध्ये भीषण पाणीटंचाई असल्यामुळे या गावांमध्ये टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत आहे बुलढाणा तालुक्यातील अजूनही काही गावांचे टँकर चालू करण्यासाठी प्रस्ताव पंचायत समिती यांच्याकडे सादर करण्यात आलेले आहे. आणि त्या गावांना सुद्धा टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येईल अशी माहिती पंचायत समितीने दिलेली आहे...

# डॉ.होमी भाभा परीक्षेत यशस्वी विद्यार्थ्यांचा गुणगौरव



**जनसंचलन/ नांदुरा**

आज दि. के.डी. इंग्लिश हायस्कूल नांदुराच्या प्रांगणात डॉ.होमी भाभा फाउंडेशन द्वारा आयोजित विज्ञान व गणित विषयाच्या परीक्षेत के. डी. इंग्लिश हायस्कूलच्या दोन सिताऱ्यांनी बाजी मारली त्याबद्दल त्यांचा गुणगौरव सोहळा १३ मार्च २०२४ ला संपन्न झाला.

यामध्ये कु. कनिष्का गजानन बावणे वर्ग ७ वी या विद्यार्थिनीने राज्यातून प्रथम क्रमांक मिळविल्या बद्दल डॉ. होमी भाभा फाउंडेशन च्या सी.ई.ओ. अस्मा फातिमा मॅम यांच्याहस्ते प्रथम पारितोषिक देऊन गौरविण्यात आले तसेच वर्ग ८ वी चा विद्यार्थी धीरज नितीन मानकर राज्यातून पहिल्या दहा विद्यार्थ्यांमध्ये आल्याबद्दल पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

यावेळी प्रमुख उपस्थिती डॉ. होमी बाबा फाऊंडेशन चे सी. एम. ओ. सुनील कुलकर्णी सर, भागवत सोयस्कर सर, विस्तार अधिकारी पंचायत समिती नांदुरा, राजेश उमाळे सर, राजीव नाथांनी सर, अध्यक्ष के. डी. इंग्लिश हायस्कूल, संचालिका सौ. श्रुती नथानी मॅम, सदस्य सौ. वीणा नथानी मॅम, मुख्याध्यापिका सौ. कविता राजपूत मॅम, उप मुख्याध्यापक गौरव गायकवाड सर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या अस्मा फातिमा यांनी विद्यार्थ्यांच्या या यशाचे श्रेय विद्यार्थी व शाळेच्या शिक्षकांना देऊन अभिनंदन केले. यावेळी विद्यार्थ्यांच्या आई वडिलांचा ही सत्कार करण्यात आला. यावेळी बहु संख्येने पालकांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या शिक्षिका सौ. स्नेहा बेद्रे मॅम यांनी केले व आभार प्रदर्शन गौरव गायकवाड सर यांनी केले.

# डॉ. शहीस्ता इनामदार यांनी मुकुल वासनिक विधी महाविद्यालय बुलडाणा येथे मुस्लिम कायद्यावर व्याख्यान



**जनसंचलन/बुलढाणा**

डॉ. शहीस्ता इनामदार यांनी मुकुल वासनिक विधी महाविद्यालय बुलडाणा येथे मुस्लिम कायद्यावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. दि.१८.३.२०२४ रोजी मुकुल वासनिक विधी महाविद्यालय बुलडाणा येथे डॉ. शाहिस्ता इनामदार, नवजीवन कॉलेज ऑफ लॉ, नाशिक यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. सदर व्याख्यानमध्ये स्कूल्स ऑफ मुस्लिम लॉ,विवाह,तलाक,वारसाहक्क , मुलांचा ताबा,हिबा व युनिफॉर्म सिव्हिल कोड लागू करणे कसे गरजेचे आहे या वर सविस्तर मारगदर्शन केले .या वेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्र. प्राचार्य प्रा. शिल्पा ठाकरे,प्रा.संतोष वानखेडे,प्रा. छाया बावणे,प्रा. प्रिया पाटील इ.होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जान्हवी सुगंधी यांनी केले तर प्रास्ताविक पूजा शिंगणे यांनी केले तर आभार प्रदर्शन रेणुका मानकर यांनी केले. या वेळी महाविद्यालयाचे कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code- MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# ग्रामसेवक संघटनेतर्फे एसडिओ यांचा सत्कार



जनसंचलन/ सिंदखेडराजा

सिंदखेड राजा येथे नुकतेच उपविभागीय अधिकारी म्हणून, प्रा. संजय खडसे रुजू झालेले आहेत, त्यामुळे सिंदखेड राजा ग्रामसेवक संघटनेतर्फे त्यांचा१९ मार्चला पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला, यावेळी शासनाचे कामकाज वेळेत पूर्ण करण्यासाठी आपण प्रशासनाला सहकार्य करावे, असे त्यांनी सांगितले, तसेच ग्रामसेवकांना शासकीय कामकाज करताना अडचण आल्यास मी सदैव आपल्या पाठीशी आहे, असे सुद्धा सांगितले, सत्कार करतेवेळी जिल्हाध्यक्ष अशोक बुरकुल, कैलासझिने, गणेश मेहत्रे, विनोद सातपुते, अरविंद राठोड, कारभारी शिंगणे, रामदास मेहेत्रे, रवींद्र काळुसे, यांच्यासह अनेक ग्रामसेवक उपस्थित होते, अशी माहिती संघटनेचे प्रसिद्धीप्रमुख विनोद सातपुते यांनी दिली आहे

# खोटी साक्ष देणाऱ्या महिलेस ५०० रुपये दंड




जनसंचलन/बुलढाणा

खोटी साक्ष दिल्याप्रकरणी एका प्रकरणातील फिर्यादी महिलेस बुलढाणा न्यायालयाने ५०० रुपये दंडाची शिक्षा १९ मार्च रोजी सुनावली. आपल्याच अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याच्या प्रकरणात बुलढाणा न्यायालयाने बुलढाणा तालुक्यातील एका गावातील व्यक्तीस २० वर्षे सश्रम कारावास व एक हजार रुपये दंड तथा अन्य कलमान्वये वेगवेगळ्या शिक्षा सुनावल्या होत्या. त्या एकाच वेळी भोगावयाच्या होत्या. या प्रकरणात फिर्यादी महिलेने न्यायालयात आपली साक्ष फिरवली होती. २०२२ मध्ये हे प्रकरण घडले होते. यामध्ये आरोपीस ३० डिसेंबर रोजी बुलढाणा न्यायालयाने शिक्षा सुनावली होती. फिर्यादी महिलेनेच साक्ष फिरवली असली तरी अन्य परिस्थितीजन्य पुरावे व वैद्यकीय पुराव्याच्या आधारे आरोपीस न्यायालयाने शिक्षा दिली होती. प्रकरणात फिर्यादी महिलेने साक्ष फिरवल्यामुळे तिच्या विरोधात न्यायालयाने कारणे दाखवा नोटीसही बजावली होती. सीआरपीसीचे ३४४ नुसार प्रकरणात कारवाई करण्यातआली होती. त्याअनुषंगाने १९ मार्च रोजी संबंधित महिला न्यायालयात हजर झाली होती. तिचे म्हणणे एकूण घेतल्यानंतर उभय बाजूंचा युक्तिवाद ऐकून विद्यमान न्यायाधीश आर. एन. मेहरे यांनी याप्रकरणात संबंधित महिलेला ५०० रुपये दंड व दंड न भरल्यास १५ दिवसांची साध्या कारावासाची शिक्षा सुनावली. साक्ष फिरवणारी महिला ही घरातील एकमेव कर्ती महिला असल्याने व पती तुरुंगात शिक्षा भोगत असल्याने लहान मुलांच्या संगोपनाची जबाबदारी तिच्यावर असल्याने न्यायालयाने तिचा सहानुभूतिपूर्वक विचार करत उपरोक्त शिक्षा सुनावली. या प्रकरणात सरकार पक्षातर्फे जिल्हा सरकारी वकील वसंत लक्ष्मण भटकर यांनी, तर कोर्ट पैरवी म्हणून बाबूसिंग बारवाल यांनी काम पाहिले.






# रेतीची अवैध वाहतूक एक टिप्पर व एक ट्रॅक्टर वर कारवाई...




जनसंचलन/ सिंदखेडराजा

सिंदखेड राजा येथे नुकतेच रुजू झालेले उपविभागीय अधिकारी प्रा.संजय खडसे यांच्या नेतृत्वाखाली व सिंदखेडराजा तहसीलदार सचिन जयस्वाल यांनी आपल्या सहकार्यासोबत देऊळगाव राजा च्या हद्दीमध्ये रेतीची अवैध वाहतूक करणारे एक टिप्पर व एक ट्रॅक्टर पकडून अंधेरा पोलीस स्टेशनला जमा केले आहे त्यामुळे उपविभागीय अधिकारी यांनी अवैध रेती वाहतूक करणाऱ्या विरोधात धडक पाऊल उचललेले आहे. सदर कारवाही १८ मार्च रात्री देऊळगाव राजाच्या हद्दीत करण्यात आली. सिंदखेड राजा येथे नुकतेच उपविभागीय अधिकारी म्हणून प्रा.संजय खडसे हे नव्याने राजू झाले. सिंदखेड राजा उपविभागातील माहिती घेऊन देऊळगाव राजा तालुक्यातील काही गावांमधून खडकपूर्णा नदीपात्रातून अवैध वाहतूक होत आहे अशी त्यांना माहिती मिळाली. त्यानुसार ते स्वतः रात्रभर गस्तीवर होते. देऊळगाव राजा तालुक्यामधील टाकरखेड भागिले, नारायण खेड, दिग्रस बु, देऊळगाव मही, चिंचखेड खडक पूर्ण नदी पात्रातून अवैध रेती वाहतूक होत आहे अशी त्यांना माहिती समजली त्यांनी या माहितीच्या आधारे ते स्वतः रात्रभर गस्तीवर होते . त्यांना गस्तीवर असताना दोन वाहने अवैध रेती करताना आढळून आली त्यांनी त्या वाहनावर कारवाई करून अंधेरा पोलीस स्टेशन येथे जमा केली. यामुळे अवैध रेती माफी यांचे धाबे दणाणले आहे.

# उद्धव ठाकरे आज जिल्ह्यात सिंदखेडराजा, मेहकरमध्ये घेणार सभा



जनसंचलन/बुलडाणा

शिवसेना ठाकरे गटाची दुसऱ्या टप्प्यातील जनसंवाद यात्रेनिमित्त शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे २० मार्च रोजी बुलढाणा जिल्ह्यात येत असून, २० मार्च रोजी मातृतीर्थ सिंदखेडराजा आणि नंतर मेहकर येथे ते सभा घेणार आहेत. दरम्यान, लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागल्यानंतर एखाद्या मोठ्या नेत्याची ही जिल्ह्यातील पहिलीच सभा ठरणार आहे. त्यामुळे या सभेत बुलढाणा लोकसभेसाठी ते प्रसंगी उमेदवारी घोषित करण्याचे संकेतही यानिमित्ताने मिळत आहेत. त्यांच्यासमवेत खा. संजय राऊत, खा. अरविंद सावंत, मिलिंद नार्वेकर, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवेप्रामुख्याने उपस्थित राहाणार आहे. मातृतीर्थ सिंदखेडराजा येथील त्यांची पहिली सभा सकाळी ११ वाजता होणार आहे. त्यानंतर मेहकरची सभा होईल. २२ फेब्रुवारी रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर ते जनसंवाद यात्रेनिमित्त आले होते. परंतु एकसंध शिवसेना अस्तित्वात असताना महाराष्ट्राचे मुख्यमंत्रिपद भूषविलेले शिवसेनेचे ज्येष्ठ नेते मनोहर जोशी यांचे निधन झाल्यामुळे दोन दिवसांचा हा दौरा अर्धवट सोडून उद्धव ठाकरे हे मुंबईला परत गेले होते. त्यावेळी चिखली, मोताळा, जळगाव जामोद येथील तीन सभा झाल्या होत्या. सिंदखेडराजा आणि मेहकर येथील सभा राहिल्या होत्या. त्या सभा ते २० मार्च रोजी घेणार आहेत. शिवसेनेतील पहिल्या बंडाचे व चौथ्या बंडाचे कनेक्शन हे बुलढाणा जिल्हा होते. मेहकरमध्येही त्यांची अलीकडील काळातील पहिलीच सभा असल्याने ते नेमके काय बोलतात, याकडे लक्ष लागले आहे.

# धाड-चांडोळ रस्त्यावर अपघात;२ जखमी

जनसंचलन/धाड

चांडोळ १८ मार्च सोमवार सकाळी १० वा दरम्यान धाड ते चांडोळ रोडवर मोटरसायकल क्रमांक महा२५एयू ९४०० चा मोटरसायकल चा अपघात झाल्याची घटना घडली आहे. बुलढाणा तालुक्यातील भडगाव येथील अमोल रामदास इर्शीद वय ३८ वर्ष, संजय तुकाराम इरशीद वय ३५ वर्षे दोघे जण भडगाव वरून ढालसावंगी मोटरसायकलने जात असतांना अपघात झाल्याचे नागरीकांना आढळुन आले. सदर घडलेल्या अपघाताचीमाहिती शिवसेना जिल्हा उप प्रमुख निलेश गुजर पाटील यांना कळल्यास घटनास्थळावर जाऊन जखमींना रुग्णवाहिकेला बोलवुन ग्रामीण रुग्णालय धाड येथे पाठविले परंतू अपघात झालेल्या जखमींची तबेत बरोबर नसल्याने तेथून जिल्हा सामान्य रुग्णालय बुलढाणा येथे रेफर करण्यात आले होते. बुलढाणा येथुन अकोला येथे दोघांना भर्ती करण्यात आल्याची माहिती धाड पोलीस स्टेशने दिली आहे. धाड पोलीस स्टेशनला घडलेल्या अपघाताची माहिती मिळताच अपघाताच्या ठिकाणीपाहणी केली असता एक हिरो होंडा मोटरसायकल हेडलाईट तुटलेला लिंबाच्या झाडाला ठोस लावून नाल्यात गेली असल्याचे प्रथम दर्शनी दिसुन आले. घटनास्थळावरील नागरीकांना दुचाकी वाहन चालवताना अचानकसमोर आयशर गाडी आल्याने त्यांचा बॅलन्स बिघडून रोडच्या खाली मोटरसायकल जाऊन झाडाला ठोस मारली असल्याचे माहिती नागरीकांनी धाड पोलीसांना दिली आहे. घडलेल्या अपघाताची धाड पोलीस स्टेशनला दप्तरी नोंद करण्यात आली आहे.

# नागपुरात गडकरींविरोधात काँग्रेस एकवटली, तगडा उमेदवार उभा करणार...

वृत्तसंस्था/नागपूर

भाजपने केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना नागपूर लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी दिली आहे. मात्र, महाविकास आघाडीला अद्याप आपला उमेदवार निवडता आलेला नाही. दरम्यान, काँग्रेसने गडकरींच्या विरोधात तगडा उमेदवार उभा करण्याची तयारी सुरू केली आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पश्चिम नागपूरचे आमदार आणि जिल्हाध्यक्ष विकास ठाकरे हे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासमोर निवडणूक लढवताना दिसणार आहे. मात्र, याची अधिकृत घोषणा अद्याप झालेली नाही. मात्र, मंगळवारी झालेल्या बैठकीत काँग्रेस नेत्यांनी ठाकरे यांच्या नावाला मंजुरी दिल्याचे सूत्रांकडून समजते.लोकसभा निवडणुकीसाठी मंगळवारी नागपूर काँग्रेसची बैठक झाली. या बैठकीला माजी खासदार विलास मुत्तेमवार, माजी पालकमंत्री सतीश चतुर्वेदी, नितीन राऊत, जिल्हाध्यक्ष विकास ठाकरे यांच्यासह सर्व बडे नेते, अधिकारी उपस्थित होते. यादरम्यान आगामी निवडणुकीत काँग्रेसच्या उमेदवाराच्या नावावर चर्चा झाली. या बैठकीत आगामी निवडणुकीत नागपूर लोकसभा मतदारसंघातून विकास ठाकरे यांना उमेदवारी देण्याचा निर्णय घेण्यात आला. माजी मंत्री चतुर्वेदी यांनी ठाकरे यांच्या नावाचा प्रस्ताव ठेवला, तर नितीन राऊत यांच्यासह उपस्थित नेत्यांनी त्यास पाठिंबा दिला. आता नेते ठाकरे यांचे नाव केंद्रीय समितीकडे पाठवतील.नागपुरातील आपले गमावलेले गढ पुन्हा मिळवण्यासाठी आता नेत्यांनी आपसातील मतभेद सोडून नितिन गडकरी यांच्या विरोधात तगडा उमेदवार उभा करण्याची तयारी सुरू केली आहे. या क्रमात तिन्ही नेते बैठकीत एकत्र बसलेले दिसले. एकेकाळी कट्टर प्रतिस्पर्धी विलास मुत्तेमवार, नितीन राऊत आणि सतीश चतुर्वेदी एकत्र आलेले दिसले. माजी खासदार विलास मुत्तेमवार, माजी मंत्री नितिन राऊत आणि सतिश चतुर्वेदी हे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आहे.एकाच पक्षात असूनही हे तिन्ही नेते किंवा त्यांचे कार्यकर्ते एकमेकांच्या विरोधात काम करताना दिसले. त्याचा परिणाम काँग्रेस पक्षावर दिसून आला. लोकसभा, विधानसभा आणि महापालिका निवडणुकीच्या वेळी पक्षांतर्गत सुरू झालेल्या या गटबाजीमुळे काँग्रेसला पराभवाला सामोरे जावे लागले आहे. २०१४ पासून पक्षाला सतत निवडणूक पराभवाचा सामना करावा लागत आहे. एकेकाळी नागपूर हा काँग्रेसचा मजबूत बालेकिल्ला मानला जात होता, मात्र सध्याच्या परिस्थितीत



त्याची अवस्था बिकट झाली आहे.नागपूर लोकसभेच्या उमेदवाराच्या प्रश्नावर माजी मंत्री नितीन राऊत यांनी तरुण आणि मजबूत चेहरा देण्याचा दावा केला आहे. बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना राऊत म्हणाले, विदर्भात काँग्रेसची लाट सुरू आहे. या जागेवर संपूर्ण देशाचे लक्ष लागून आहे. नागपूर हा काँग्रेसचा बालेकिल्ला आहे. उमेदवाराच्या प्रश्नावर बोलताना राऊत म्हणाले की, आगामी निवडणुकीत तरुण आणि तगडा उमेदवार देऊ, ज्याला पाहून सर्वांनाच धक्का बसेल.

# भाजपसोबत जाऊन राज ठाकरेंनी दिल्लीत झुकलेलं हे लोकांना आवडणार नाही, फेरविचार करावा-रोहित पवार...

वृत्तसंस्था/जळगाव खा.

मुख्यमंत्री असतील किंवा मंत्री ते जर गुंडाकडून फुले आणि सन्मान घेत आहेत. गुंड मंत्रालयात येताना रील करत आहेत. यावरुन गुंडाना भीती राहिलेली नाही, असे सिध्द होते. दिवसाढवळ्या गोळ्या घातल्या जात आहेत. हे बघितल्यावर भाजप महाराष्ट्राला बिहार आणि युपीच्या वाटेवर नेत असल्याचा आरोप राष्ट्रवादी शरद पवार गटाचे युवानेते आमदार रोहित पवार यांनी जळगाव जिल्ह्याच्या दौऱ्याप्रसंगी केला. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे युवानेते आमदार रोहित पवार आदिवासी संस्कृतीचा होळी उत्सवातील भोंगऱ्या बाजार अनुभवण्यासाठी चोपडा तालुक्यातील मालापूर येथे आले होते. यावेळी त्यांनी चोपडा येथिल ज्येष्ठ नेते तथा माजी विधानसभा अध्यक्ष अरुण गुजराथी तसेच पदाधिकारी डॉ. चंद्रकांत बारेला यांच्या निवासस्थानी जाऊन भेट घेतली. त्यानंतर त्यांनी भोंगऱ्या बाजाराच्या उद्घाटन कार्यक्रमाला उपस्थिती देत आदिवासी पेहराव करीत या उत्सवात सहभाग घेतला. यावेळी त्यांनी पत्रकारांशी बोलताना राज्य आणि केंद्र सरकारवर टीका केली.

राज्यात कधी नव्हती तशी कायदा सुव्यवस्थेची परिस्थिती झाली आहे. मुख्यमंत्री गुंडाकडून सत्कार स्विकारत असल्याने गुंडाची हिंमत वाढली आहे. खुलेआम गोळीबार होत आहेत. आमदारांवर हल्ले होत आहे. त्यामुळे भाजप महाराष्ट्राला युपी व बिहारच्या वाटेवर नेत असल्याचे म्हणावे लागत आहे. काही नेते मोक्का रद्द करीत आहे. या सर्व गोष्टी महाराष्ट्राच्या हिताच्या नसल्याचा आरोप रोहित पवार यांनी केला. लोक भाजपच्या विरोधात आहेत. येथे उमेदवार जाहीर होईल तेव्हा भाजपच्या विरोधात वातावरण आणखी तापेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. एकनाथ खडसे हे ज्येष्ठ नेते आहेत. त्यांची प्रकृती ठीक नसल्याने त्यांनी माघार घेतली आहे. तेथे लवकरच सक्षम उमेदवार जाहीर करण्यात येईल असेही पवार म्हणाले. महाराष्ट्र देशातील सर्वात विकसीत राज्य आहे. दिल्लीसमोर हे राज्य कधीही झुकले नाही. पण, इथले नेते दिल्ली वाऱ्या करतात, मागण्या करतात. त्या ऐकल्या जात नाहीत. नेत्यांनी दिल्लीत जाऊन झुकणे किती योग्य आहे? असा प्रश्न जनतेला पडला आहे. याची चिड जनतेत आहे. त्यामुळे महाविकास आघाडीतील उमेदवार निवडून येतीलच, असा विश्वासही पवार यांनी व्यक्त केला. राज ठाकरे यांनी मागील निवडणुकीत भाजपविरोधात सामान्याच्या बाजूने भाषणे केली. बेरोजगारीचा प्रश्न उचलून धरला. ते जर भाजपसोबत जात असतील आणि दिल्लीसमोर झुकत असतील



तर ते लोकांना आणि आम्हालाही आवडणार नसल्याचे रोहित पवार म्हणाले. त्यांनी फेरविचार करावा, असे त्यांचेच कार्यकर्ते म्हणत असल्याची माहिती आम्हाला मिळाल्याचेही पवार यांनी सांगितले.ते पुढे म्हणाले की, राज्यातील पाणी टंचाईकडे शासनाचे दुर्लक्ष झाले आहे. अद्याप टँकर सुरु झालेले नाहीत. सन २०११ च्या लोकसंख्येनुसार पाण्याचे टँकर दिले जाणार आहे, त्यामुळे ते पाणी कसे पुरणार? काही संघटनांची टँकर देण्याची तयारी आहे तर सरकार आचारसंहितेचे कारण सांगत आहे. सरकार कमी पडत असताना संघटनांना देखील थांबविले जात आहे. मग सामान्य लोकांना पाण्याविना मरु द्यावे का? असा संतापही रोहित पवार यांनी व्यक्त केला. राज्यात कृषीमंत्री कुठे आहेत? अशी परिस्थिती निर्माण झाली असल्याचेही ते म्हणाले.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958